श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

# संगमेश्वर कॉलेज
# सोलापूर



# प्रतिभासंगम

वर्ष दुसरे । अंक ५वा । एप्रिल २०२० ते मार्च २०२१

**श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...**
**संगमेश्वर कॉलेज,सोलापूर**




प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती –**
प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य
उपप्राचार्य आनंद हुली
प्रा. एस .जे.आवटे
प्रा.दीपक पाटील
प्राचार्य गायत्री कुलकर्णी

**मुखपृष्ठ** – सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी** – प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक -**
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई-मेल** –
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## संपादकीय ...

'प्रतिभासंगम'च्या अंकाचे हे दुसरे वर्ष. हा पाचवा अंक कोविड १९ च्या काळातील आहे. बारावी ऑनलाईन परीक्षांचे निकाल या कालावधीत घोषित झाले. कर्मयोगी कै.आप्पासाहेब यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी स्पर्धा झाल्या. या स्पर्धा यंदा ऑनलाइन घेण्यात आल्या. जेईई मेन परीक्षेत उत्तीर्ण गुणवंतांचा सत्कार कॉलेजच्या वतीने करण्यात आला.आयआयटीसह नाटा परीक्षेतही संगमेश्वरचे विद्यार्थी चमकले. प्रत्यक्ष कॉलेज बंद असले तरी शाळा आणि महाविद्यालयामधील शिक्षण सुरू राहिले ते केवळ ऑनलाइन माध्यमामुळे. या संधीचा फायदा घेत वरिष्ठ महाविद्यालयात वैविध्यपूर्ण वेबीनार्स झाले. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने वाचू आनंदे या विषयावर नितीन वैद्य यांचे दूर दृश्य प्रणालीद्वारे व्याख्यान झाले. नीट परीक्षेतही संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. कोरोनाच्या काळात सुरक्षा महत्त्वाची असल्याने शासनाने निर्देशित नियम पाळतच सगळा प्रशासकीय डोलारा चालत होता. सुरक्षेला प्राधान्य देऊन वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले गेले.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी डॉ. शोभना शहा यांचे व्याख्यान झाले. एमएचटी-सीईटी परीक्षेत ९० पेक्षा जास्त पर्सेंटाइलचे 50 विद्यार्थी संगमेश्वरचे ठरले. प्रा.डॉ. सोमनाथ कोमरपंत यांच्या व्याख्यानाने मराठी विभागाच्या ऑनलाईन वर्षारंभाचा कार्यक्रम झाला. मराठी भाषा पंधरवडा निमित्त आकाशवाणीचे ज्येष्ठ निवृत्त निवेदक ऋषिकेश आयाचित यांचे व्याख्यान झाले. सृजनरंग नियतकालिक स्पर्धेत २०१९ - २० साठी 'प्रज्ञा' वार्षिक अंकास विद्यापीठ स्तरावरील दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला, ही अभिनंदनीय आणि अभिमानाची गोष्ट. मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून डॉ.छाया महाजन यांचे व्याख्यान ऑनलाईन झाले.

मातृभाषा विद्यार्थी जीवनाला आकार देते. वैविध्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण मिळते. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने शालेय स्तरावरील उपक्रम कौतुकास्पद आहेत. कला ,साहित्य , संगीताची गोडी विद्यार्थ्याला परिपूर्ण घडवण्यासाठी कारणीभूत ठरतात.'' असे प्रतिपादन संगीत शिक्षक, कवी, लेखक, पं.दीपक कलढोणे यांनी केले. ते संगमेश्वर पब्लिक स्कूल आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कोरोनाचे नियम काहीसे शिथिल झाल्यानंतर हा कार्यक्रम संपन्न झाला.

ऑनलाइन शिक्षणामुळे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषा संकुलाच्या वतीने ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कोविड काळात ऑनलाइन झालेल्या कार्यक्रमांचे प्रसारण कॉलेजच्या SES.sagameshwarcollege युट्युब चॅनेलवरून वेळोवेळी झाले.

# बारावीत संगमेश्वर कॉलेजची यशाची परंपरा कायम
# बारावीचा निकाल ९० .४२ टक्के

**सोलापूर दिनांक ( 16 जुलै)**
येथील संगमेश्वर ज्युनिअर कॉलेज ,सोलापूरचा बारावीचा निकाल ९० .४२ टक्के इतका लागला. शाखा निहाय निकालाची टक्केवारी पुढीप्रमाणे - विज्ञान शाखा - ९८.५७ , वाणिज्य शाखा - ९५.१३, कला शाखा - ७१.९७ टक्के इतका लागला . विज्ञान व वाणिज्य शाखेत मुलींनी बाजी मारली.
तर कला शाखेतून तुषार मारुती देवकते याने कॉलेजमधून पहिला येण्याचा मान मिळवला. विज्ञान शाखेतून एकूण ४९३ विद्यार्थी , वाणिज्य शाखेतून ५७५ ,तर कला शाखेतून ३६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. **यशस्वी विद्यार्थी-** विज्ञान शाखेतून सुरभी मोहन देशपांडे व चैत्राली संजय कुलकर्णी ( प्रथम ९०.९२ ), ऐश्वर्या दत्तात्रय गवंडी (द्वितीय ९०.७६ ), साक्षी जयेश हेडगिरे ( तृतीय ९०.४६ ), तर **वाणिज्य शाखेतून -** निवेदिता अतुल देशपांडे व रंजन नरेंद्रकुमार वत्सल (प्रथम ९०. ४६ ) ऋतुजा दीपक तारापुरे (द्वितीय ८९.५४ ), तुषार सतीश दरक ( तृतीय ८८.४२ ), **कला शाखेतून -** तुषार मारुती देवकाते ( प्रथम ९०.६१ ) ,मिताली व्यंकटेश चौबे ( द्वितीय ८८.४६ ) वैभवलक्ष्मी विजयकुमार पार्सेकर ( तृतीय ८७.८४ )
**कॉलेजमधून भाषा विषयातून पहिले आलेले विद्यार्थी** - हिंदी - सुमन सिताराम पंगुडवाले (९५), मराठी - वैष्णवी मल्लिनाथ शरणार्थी (९४), संस्कृत - यशश्री राजेंद्र जोशी (८५ ) ,इंग्रजी - त्रिशला राजेंद्र नाईक (८९ ) ,कन्नड - अंबिका रेवाप्पा बंडगर ( ९०).

या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी ,संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी , प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य आनंद हुली, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील , विज्ञान शाखा समन्वक प्रा. प्रमोद उडगीकर, वाणिज्य समन्वयक प्रा. बसय्या हणमगाव यांनी कला शाखा समन्वयक प्रा.शिवशरण दुलंगे यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापकवृंद , कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी ,संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी , प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य आनंद हुली, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील , विज्ञान शाखा समन्वक प्रा. प्रमोद उडगीकर, वाणिज्य समन्वयक प्रा. बसय्या हणमगाव यांनी कला शाखा समन्वयक प्रा.शिवशरण दुलंगे यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापकवृंद , कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

# बारावीत संगमेश्वर कॉलेजची यशाची परंपरा कायम

## विज्ञान शाखेतील आमचे गुणवंत



सुरभी मोहन देशपांडे
(प्रथम 90.92 )



चैत्राली संजय कुलकर्णी
(प्रथम 90.92 )



ऐश्वर्या दत्तात्रय गवंडी
(द्वितीय 90.76 )

साक्षी जयेश हेडगिरे
( तृतीय ९०.४६ )

## हार्दिक अभिनंदन



S. S. E. SOCIETY
SOLAPUR

# बारावी परीक्षेत संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश ....

## कला शाखेचे आमचे गुणवंत

## हार्दिक अभिनंदन



तुषार देवकते 90.61
प्रथम क्रमांक



मिताली चौबे 88.46
द्वितीय क्रमांक



वैभवलक्ष्मी पार्सेकर 87.84
तृतीय क्रमांक




# बारावीत संगमेश्वर कॉलेजची यशाची परंपरा कायम

## वाणिज्य शाखेतील आमचे गुणवंत

# हार्दिक अभिनंदन



रंजन नरेंद्रकुमार वत्सल
(प्रथम ९०. ४६ )



निवेदिता अतुल देशपांडे
(प्रथम ९०. ४६ )



ऋतुजा दीपक तारापुरे
(द्वितीय ८९.५४ )



तुषार सतीश दरक
(तृतीय ८८.४२ )



**इयत्ता 10 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन..!!**

## संगमेश्वर कॉलेज , सोलापूर

**शैक्षणिक वर्ष 2020-2021 साठी 11 वीचा Online प्रवेश अर्ज.**

**Jr College XI Admission Link -**

http://sangameshwarcollege.in/pages/fyjc_admission.aspx

**विद्यार्थी मित्रांनो सर्व माहिती काळजीपूर्वक भरा.**

**अधिक माहितीसाठी संपर्क -**

**Mob -** 95117 20293 **Arts**

**Mob -** 97667 70630 **Science**

**Mob -** 94200 89535 **Commerce**

# आकाशवाणी सोलापूर आणि संगमेश्वर पब्लिक स्कूल

यांच्या संयुक्त विद्यमाने

## कर्मयोगी अप्पासाहेब कादादी जयंतीनिमित्त



## राज्यस्तरीय Online आंतरशालेय कथाकथन, वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा २०२०

**बाल गट :**

**इयत्ता पाचवी ते सातवी – वेळ ४+१ एकूण ५ मिनिटे**

**किशोर गट :**

**आठवी ते दहावी – वेळ ५+२ एकूण ७ मिनिटे**

प्रत्येक गटातून इयत्तेनुसार प्रत्येकी एक असे दोन गटातून एका शाळेचे ६ स्पर्धक पाठवावेत. कथाकतन आणि वक्तृत्व स्पर्धेसाठी एकूण एका शाळेचे १२ विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी होतील. चित्रकलेसाठी प्रत्येक वर्गातून २ असे ८ विद्यार्थी सहभागी होतील. कथाकथनासाठी आपल्या इयत्तेतील बालभारती पाठ्यपुस्तकातील कथा निवडून घ्यावी. कथेसाठी वेळेचे बंधन नाही. वक्तृत्व स्पर्धेसाठीचे विषय खालीलप्रमाणे आहेत. दोन्ही स्पर्धेसाठी स्पर्धक वेगवेगळे असतील याची सहभागी स्पर्धक आणि शाळांनी कृपया नोंद घ्यावी.

**विषय – बाल गट माध्यम : – English / हिंदी / मराठी (कोणतेही एक)**

- कोरोना योद्धा
- सोबत आकाशवाणीची
- निसर्ग आणि मानव
- आमचे शेजारी

**विषय – किशोर गट माध्यम : – English / हिंदी / मराठी (कोणतेही एक)**

- ऑनलाईन शिक्षण प्रगतीचे लक्षण
- निसर्ग एक जादूगार
- सावध ऐका, पुढल्या हाका
- आत्मनिर्भर उद्यासाठी

विजेत्या स्पर्धकांना – अनुक्रमे प्रथम (७००), द्वितीय (६००), तृतीय (५००) अशी रक्कम, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात येईल आणि आकाशवाणीच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल.

**Google Form द्वारे Online नावनोंदणीची अंतिम तारीख १० सप्टेंबर आहे.**

**नांव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क :**

संगमेश्वर पब्लिक स्कूल, संगमेश्वर कॉलेज आवार, सात रस्ता, सोलापूर

Website : www.sanps.in ● Email : sanpublicschool16@gmail.com

मोबाईल : **9822786773** (कथाकथन), **9730903302** (वक्तृत्व), **8624850678** (चित्रकला), **9422651741** (आकाशवाणी)

या संपूर्ण स्पर्धा Online च होणार आहेत. या स्पर्धेबद्दलची माहिती तुम्हाला वेळोवेळी आमच्या Whatsapp ग्रुप द्वारे कळविण्यात येईल.

**आकाशवाणी सोलापूर**
**तुमच्याशी जुळलेले वेव्हलेन्थ...**

### चित्रकला स्पर्धा

वयोगट
इ. १ ली ते ४ थी

दिनांक व वेळ
१५.९.२०२० रोजी
स. ८.३० ते १०.३०

विषय
निसर्ग/पाणी वाचवा/
स्वच्छता/कोविड योध्दा/
ऑनलाईन शिक्षण

ऑनलाईन स्पर्धा
दि. १४ सप्टेंबर २०२०
रोजी सकाळी ११ वा.
अधिक माहितीसाठी
**www.sanps.in**
या वेबसाईटला
वेळोवेळी भेट द्या



**प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय आंतरशालेय ऑनलाइन कथाकथन, वक्तृत्व आणि इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे. आकाशवाणी सोलापूर आणि संगमेश्वर पब्लिक यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होत आहे.नक्की सहभागी व्हावे ही नम्र विनंती.**

**माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचा.**

**माध्यम प्रायोजक - आकाशवाणी सोलापूर**

**स्पर्धेच्या सविस्तर माहितीसाठी माहितीपत्रकातील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.**

**कथाकथन - 9822 78 67 63**

**वक्तृत्व - 9730 90 33 02**

**चित्रकला - 9624 850 678**

**Google Form द्वारे Online नावनोंदणीची अंतिम तारीख १० सप्टेंबर २०२० आहे. या संपूर्ण स्पर्धा Online च होणार आहेत. या स्पर्धेबद्दल माहिती तुम्हाला वेळोवेळी आमच्या Whats app ग्रुप द्वारे कळविण्यात येईल.**

**आधी माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचा लवकरच गुगल लिंक उपल करत आहोत स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी वेळोवेळी पब्लिक स्कूलची वेबसाईट चेक**

करा **https://sanps.in/**



# जेईई-मेन संगमेश्वर कॉलेजचे घवघवीत यश यशस्वी गुणवंतांचा संस्थेच्यावतीने सत्कार

सोलापूर ( प्रतिनिधी )- नॅशनल टेस्टिंग एजन्सी नवी दिल्ली, यांच्या मार्फत जानेवारी - सप्टेंबर २०२० मध्ये घेण्यात आलेल्या जेईई-मेन या परीक्षेत संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. एकूण दहा लाख 23 हजार विद्यार्थ्यांनी फॉर्म भरले होते.त्यापैकी सात लाख 15 हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती . त्यातून विविध संवर्गातील हे विद्यार्थी जेईई-ॲडव्हान्स साठी पात्र झाले. त्यांना आता आयटी ॲडव्हान्स परीक्षेसाठी सामोरे जावे लागणार आहे. या परीक्षेसाठी खुल्या वर्गाचा पर्सेंटाइल कटऑफ 90.37,ईडब्ल्यूएस 70. 24, ओबीसी 72.88, एससी 50.17,एसटी 39.06 असा घोषित झाला. महाविद्यालयातून १८ हून अधिक विद्यार्थ्यांना ९० पेक्षाजास्त पर्सेंटाइल प्राप्त झाला. परीक्षेत यशस्वी झालेले संगमेश्वर....

**कॉलेजचे गुणवंत**


व्यंकटेश निंबाळे 99.29
रमाक्ष बिराजदार 98.57
विद्यारण्य गवळी 98.06
ऐश्वर्या गवंडी 97.83
ऋषिकेश दंडगल 87.82
वेदांत माढे 96.96
कृतिका पतंगे 96.65
आर्या गोरटे 96.43
अपूर्वा शहाणे 96.22
अमेय स्वामी 94.86
दिव्या केकडे 94.86
ऋतुजा खिल्लारे 94.63
नेहा शिरसागर 92.31
संकेत निंबर्गी 90.80
रितेश जकापुरे 90.23
श्रीनेश कांबळे 90.22
शंतनु इंगोले 73.57
अक्षय मिसाळ 72.92



या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी , प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य आनंद हुली, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील , विज्ञान शाखा समन्वक प्रा. प्रमोद उडगीकर, यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापकवृंद , कर्मचारी आदींनी अभिनंदन केले. उपप्राचार्य आनंद हुली यांनी प्रास्ताविक केले. यादीवाचन पर्यवेक्षक प्रसाद कुंटे यांनी तर सूत्रसंचालन डॉक्टर गणेश मुडेगावकर यांनी केले.



**ऐश्वर्या गवंडी 97.83- IIT ( JEE AD) OBC AIR Rank 8318**



# कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या 111 व्या जयंतीदिनी आयोजित ऑनलाइन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे प्रसाद लोखंडे,अक्षय इळके विजेते

सोलापूर (दिनांक १५)
दैनिक संचार प्रबोधन मंच
आणि कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
कर्मयोगी अप्पासाहेब काडादी जयंती प्रीत्यर्थ ऑनलाइन महाविद्यालयीन उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा आज संपन्न झाली. राज्यभरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. उस्फुर्त वक्तृत्व स्पर्धेतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऐनवेळेस मिळालेला विषय. महाविद्यालयीन गटात 11वी ते पदव्युत्तर पदवी पर्यंत शिकणारे विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण, नेपोटिझम , कोरोना,अध्यात्म , धर्म , अर्थव्यवस्था, आत्मनिर्भर कोविड योद्धा, यासह समाजातील सर्वच स्तरावरील आपले विषय हिरीरीने मांडले.

**निकाल**

प्रथम - प्रसाद लोखंडे (सांगोला महाविद्यालय, सांगोला ), व्दितीय - अक्षय इळके (नाईट कॉलेज, इचलकरंजी), तृतीय क्रमांक विभागून - मीनल कस्तुरे ( संगमेश्वर कॉलेज) यश पाटील (बी. के. बिर्ला कॉलेज, कल्याण) , चौथा क्रमांक - प्रसाद जगताप ( विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , धुळे), पाचवा क्रमांक- सुशिलकुमार दोडके- एसपीएन शिरसाळा , परळी वैजनाथ सहावा क्रमांक ( विभागून ) - स्मिता चव्हाण, ( कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली ) सुजित काळंगे (संस्कार मंदिर महाविद्यालयय, वारजे- पुणे ) उत्तेजनार्थ - स्नेहल वर्दे ( संगमेश्वर कॉलेज) अश्विनी तावरे (आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे )



# कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या १११ व्या जयंतीदिनी आयोजित ऑनलाइन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे प्रसाद लोखंडे, अक्षय इळके विजेते

## हार्दिक अभिनंदन



**प्रसाद लोखंडे**
**(सांगोला महाविद्यालय, सांगोला )**

चौथा क्रमांक - प्रसाद जगताप ( विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , धुळे), पाचवा क्रमांक- सुशिलकुमार दोडके- एसपीएन शिरसाळा , परळी वैजनाथ सहावा क्रमांक ( विभागून ) - स्मिता चव्हाण, ( कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली ) सुजित काळंगे (संस्कार मंदिर महाविद्यालयय, वारजे- पुणे ) उत्तेजनार्थ - स्नेहल वर्दे ( संगमेश्वर कॉलेज) अश्विनी तावरे (आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे )



**व्दितीय - अक्षय इळके**
**(नाईट कॉलेज, इचलकरंजी)**





**तृतीय क्रमांक विभागून - यश पाटील ( बी. के. बिर्ला कॉलेज,कल्याण ) मीनल कस्तुरे ( संगमेश्वर कॉलेज )**

**पारितोषिके**

प्रथम क्रमांक – १५०० रुपये
द्वितीय क्रमांक – १००१ रुपये
तृतीय क्रमांक – ७०१ रुपये
चौथा क्रमांक – ५०१ रुपये
पाचवा क्रमांक – ४०१ रुपये
सहावा क्रमांक – ३०१ रुपये
उत्तेजनार्थ दोन प्रशस्तिपत्रके

प्रारंभी संगमेश्वर कॉलेजच्या आवारात झालेल्या उदघाटन सत्रात सकाळी 11 वाजता कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांना अभिवादन करून यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. मराठी विभाग प्रमुख डॉ.सुहास पुजारी यांनी या सत्राचे प्रास्ताविक केले. उपस्थित परीक्षक डॉ. देवीदास गुरव आणि प्रा. नानासाहेब गव्हाणे यांचा कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली, कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्थेचे प्रा. बी. एन. पटणे आदी मान्यवर उपस्थित होते. या उद्घाटन सत्रात सूत्रसंचालन करून सूचना आणि तांत्रिक बाबी प्रा. संतोष पवार यांनी स्पष्ट केल्या.

त्यानंतर स्पर्धेस सुरुवात झाली.

स्पर्धा यशस्वितेसाठी प्रा. राजकुमार खिलारे, प्रा. शीला रामपुरे डॉ. मंजू संगेपाग,आदींनी सहकार्य केलं तर तंत्र सहाय्यक म्हणून संतोष फुलारी आणि प्रशांत जोकारे यांनी सहाय्य केले.डॉ.सुहास पुजारी यांनी शेवटी निकाल घोषित केला तत्पूर्वी परीक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.या संपूर्ण पाच तास ऑनलाईन चाललेल्या वक्तृत्व स्पर्धेचे सूत्रसंचालन शिवराज पाटील यांनी केले तर प्रा. सुहास दहिटणेकर यांनी मानले.

# आयआयटीसाठी संगमेश्वरचे ३ विद्यार्थी पात्र तर नाटामध्ये ४ विद्यार्थी चमकले

**( सोलापूर- दिनांक 7 प्रतिनिधी )**
अखिल भारतीय स्तरावरील अभियांत्रिकीच्या महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या (सप्टेंबर 2020 )
जेईई-मेन या परीक्षेसाठी 10 लाख विद्यार्थी बसले होते. त्यातून 1लाख 51हजार 311 विद्यार्थी जेईई - ऍडव्हान्स साठी पात्र झाले. आयआयटी पात्रता परीक्षा 27 सप्टेंबरला झाली. काल या परीक्षेचा निकाल लागला. यातून भारतातून फक्त 43 हजार 204 चार विद्यार्थी भारताच्या सर्वोच्च अभियांत्रिकी संस्था (आयआयटी )साठीच्या
जेईई -ऍडव्हान्स परीक्षा देऊन पात्र झाले. या परीक्षेत संगमेश्वरचे तीन विद्यार्थी चमकले वेदांत माढे हा विद्यार्थी 78 टक्के गुण घेऊन ओबीसी मधून ऑल इंडिया रँक 6000 वर राहिला. व्यंकटेश निंबाळे 73 टक्के गुण घेऊन खुल्या प्रवर्गातून ऑल इंडिया रँक 27893 क्रमांकावर राहिला. ऐश्वर्या गवंडी 65 टक्के गुण घेऊन ओबीसी मधून ऑल इंडिया रँक 8318 व्या क्रमांकावर राहिली.

याबरोबरच आर्किटेकसाठीच्या नाटा परीक्षेचा निकाल काल लागला.यात चार विद्यार्थीनी पात्र ठरले. जिया आहुजा हिला 157.5 गुण मिळाले.तर तिच्या भगिनीला प्रियांका आहुजा हिला 155 गुण मिळाले. या गुणांसह आर्किटेक साठी असलेल्या नाटाच्या या महत्वपूर्ण परीक्षेत या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.
या घवघवीत यशाबद्दल संगमेश्वर कॉलेजच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी , उपप्राचार्य आनंद हुली, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील , विज्ञान शाखा समन्वक प्रा. प्रमोद उडगीकर, यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापकवृंद , कर्मचारी आदींनी अभिनंदन केले. उपप्राचार्य आनंद हुली यांनी प्रास्ताविक केले. यादीवाचन आणि सूत्रसंचालन डॉक्टर गणेश मुडेगावकर यांनी केले.



संगमेश्वर कॉलेज, सोलापूर
S. S. E. SOCIETY
SOLAPUR
आयआयटीसाठी संगमेश्वरचे ३ विद्यार्थी पात्र
तर नाटामध्ये ४ विद्यार्थी चमकले
वेदांत माढे
व्यंकटेश निंबाळे
ऐश्वर्या गवंडी
प्रियांका आहुजा NATA 155.5
जिया आहुजा NATA 157
समृद्धी बोरगावकर NATA 117
ईश्वरी वैद्य NATA 86
हार्दिक अभिनंदन ...




SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR
BEST PERFORMERS IN NEET
Kazi Mustakim
Govt. MBBS
Joshi Nachiket
Govt. MBBS
BEST PERFORMARS IN MAHARASHTRA STATE BOARD EXAM - 2019
1st in Solapur District
Shreya Kolur
91.84%
Riddhi Tharewal
89.07%
Vishvanath Pawar
88.92%
JEE ADVANCED 2020 TOPPERS
Vedant Madhe
78%
Venketesh Nimbal
73%
Aishwarya Gawandi
65%




**शनिवारी दिनांक – 17 ऑक्टोबर 2020 रोजी सकाळी 11 वाजता झालेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना आपल्या कॉलेजच्या SES.sangameshwarcolllege या यूट्यूब चॅनलवर थेट पाहता येईल**

https://www.youtube.com/channel/UCrXAcpbSeg8zLBk_47r3S4A...

YouTube

https://www.youtube.com/c/SESSangameshwarCollege/videos

# नीट परीक्षेत संगमेश्वर कॉलेजमधून साक्षी हेडगिरे,चैत्राली कुलकर्णी प्रथम

सोलापूर (प्रतिनिधी)
नॅशनल टेस्टिंग एजन्सी यांच्यामार्फत सप्टेंबर 2020 मध्ये घेण्यात आलेल्या नीट राष्ट्रीय पातळीवरील वैद्यकीय पात्रता पूर्वपरीक्षेत भारतातून 14 लाख 37 हजार विद्यार्थी बसले होते.यामध्ये संगमेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले .साक्षी हेडगीरे 565, चैत्राली कुलकर्णी 565, शिवकुमार उपासे 549 , ऋषिकेश होनमाने 534 या विद्यार्थ्यांनी पाचशेहून अधिक गुण घेऊन महाविद्यालयात अव्वल येण्याचा मान मिळवला. पात्रताधारक विद्यार्थी
रोहित काकडे 405, छाया शिंदे 396, ओम पाटील 391, प्राजक्ता कांबळे 384 ,प्रतीक्षा पाटील 376, श्वेता पवार 355,आदित्य निकम 347, अंजली निंबर्गी 343 ,आदित्य निंबाळकर 339 ,सचिन सिलिंग 316
या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना जयराज हेडगिरे यांनी संगमेश्वर महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे ऋण व्यक्त केले . याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी , प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य आनंद हुली, लॉजिक इन्स्टिट्यूटचे प्रा. डॉ. अनिल देवकर , पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, यांनी अभिनंदन केले.
या प्रसंगी विज्ञान विभाग प्रमुख प्रा. प्रमोद उडगिकर,प्रा. रामराव राठोड, प्रा. रवी कट्टी,भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील प्रा. सुषमा पाटील, प्रा. लीना खमितकर ,प्रा.प्रशांत शिंपी ,प्रा.नागेश कोल्हे ,प्रा.विशाल जत्ती, समन्वय डॉ. गणेश मुडेगावकर, प्रा. रोहन डोंगरे प्रा. संतोष पवार आदी उपस्थित होते.




NEET 2020 TOPPERS


Hedgire Sakshi
565


Kulkarni Chaitrali
565


Shivkumar Upase
549


Rushikesh Honmane
534

# संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

## नीट परीक्षेत संगमेश्वरमधून साक्षी हेडगिरे, चैत्राली कुलकर्णी प्रथम



साक्षी हेडगिरे 565



चैत्राली कुलकर्णी 565



शिवकुमार उपासे 549



ऋषिकेश होनमाने 534

# हार्दिक अभिनंदन ...

---

**संगमेश्वर कॉलेज सोलापूर**
**कला विभाग आणि भाषा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने**
**राष्ट्रीय युवा दिन**
**स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त ऑनलाईन व्याख्यान**
**विषय – स्वामी विवेकानंद आणि युवक**
**मंगळवारी १२ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ९.३० वाजता**
**कॉलेजच्या या युट्युब चॅनेलवर संपन्न झाले.**
**वक्त्या – मा. डॉ. शोभना शहा**
**विषय – स्वामी विवेकानंद आणि युवक**

**हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना आपल्या कॉलेजच्या SES.sangameshwarcolllege या यूट्यूब चॅनलवर थेट पाहता येईल कार्यक्रमाची थेट लिंक**

https://youtu.be/rdXb0QzhrZA

# एमएचटी-सीईटी परीक्षेत नव्वदपेक्षा जास्त पर्सेन्टाइल मिळवणारे ५० हुन अधिक विद्यार्थी संगमेश्वरचे

सोलापूर - (दिनांक ३० ) येथील एमएचटी-सीईटी 2020 परीक्षेत संगमेश्वरचे नव्वदपेक्षा जास्त पर्सेन्टाइल मिळवणारे ५० हुन अधिक विद्यार्थी चमकले.परीक्षेचा निकाल रात्री 11 वाजता जाहीर झाला. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी अभ्यासक्रामांच्या प्रवेशांसाठी एमएचटी-सीईटी ही सामायिक प्रवेश परीक्षा यावर्षी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली होती. निकाल विद्यार्थ्यांसाठी सीईटीच्या अधिकृत संकेतस्थळवर उपल आहे. विद्यार्थ्यांना आपले निकाल mhtcet2020.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर पाहता येणार आहेत.

एमएचटी-सीईटी परीक्षेत संगमेश्वरमधून ऐश्वर्या गवंडी 99.91 प्रथम तर वेदांत माढे 99.66 द्वितीय आला. त्यापुढील निकाल -

व्यंकटेश निंबाळे 99.41
दिव्या केकडे 99.15 ,
सुरभी देशपांडे 99.14,
विद्यारण्य गवई 98.97
आर्या कापसे 98.68
ऋतुजा खिलारे 99.91
अक्षता चिंचोळी 98.55
शिवानंद हत्तळी 98.49
गायत्री बटगिरी 98.36
रश्मी नानजकर 98.23
हर्ष कदम 97 .78
अथर्व जाधव 97.67
अन्नपूर्णा हेळकर 97.5
प्रथम पाटील 96.85
अमेय स्वामी 96.70
महेश संजीव 96.65
नेहा क्षीरसागर 96.23
श्रीनेश कांबळे 96.22
अक्षय मिसाळ 96.22
संकेत दुधामाडे 95.71
पुतळाबाई कुसगले 95.34
मृणाली खटके 94.93
अनुज निर्मल 94.8
गीतांजली माळी 94.34
शंतनू इंगोले 93.95
चिन्मय परांजपे 93.79
प्रथमेश जाधव 93.53
रितेश जकापुरे 93.18
स्वप्नील बिराजदार 93.00
प्रथमेश जाधव 93.00
मनीषा धुळे 92.03
मृणाल खजिनदार 91.14
शिवानी खांडेकर 90.13



यंदा सीईटी सेलकडून पीसीएम व पीसीबी गटाच्या 100 पर्सेंटाइलच्या विद्यार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून यात मुंबई व पुण्याच्या विद्यार्थ्यांचा वरचष्मा दिसून आला. एमएचटी सीईटी परीक्षेसाठी राज्यातून 5 लाख 42 हजार 431 उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यातील 3 लाख 86 हजार 604 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी ,व्ययस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी , प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य आनंद हुली, लॉजिक इन्स्टिट्यूटचे सुशांत माळवे,अविनाश घोडके, शिवराज बगले , प्रा. डॉ. अनिल देवकर यांनी अभिनंदन केले.

या प्रसंगी विज्ञान विभाग प्रमुख प्रा. प्रमोद उडगिकर,प्रा. अभिजित निवर्गीकर ,प्रा. विश्वजित आहेरकर, प्रा. तुकाराम साळुंके,भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील,प्रा.विशाल जत्ती, समन्वय डॉ. गणेश मुडेगावकर, प्रा. रोहन डोंगरे प्रा. संतोष पवार आदी उपस्थित होते.

फोटो ओळी - संगमेश्वरचे एमएचटी-सीईटी परीक्षेत नव्वदपेक्षा जास्त पर्सेन्टाइल गुण मिळवणारे विद्यार्थी.

## MAH-CET 2020 TOPERS (PCM/PCB)


Aishwarya Gawandi
99.91%tile


Vedant Madhe
99.66%tile


Venketesh Nimbale
99.41%tile


Divya Kekede
99.15%tile


Surabhi Deshpande
99.14%tile


Vidyaranya Gawai
98.97%tile


Aarya Kapse
98.68%tile


Rutuja Khilari
98.58%tile


Akshta Chincholi
98.55%tile


Shivanand Hattali
98.49%tile


Gayatri Batgiri
98.36%tile


Rashmi Nannajkar
98.23%tile


Atharva Jadhav
97.67%tile


Annapurna Helkar
97.05%tile


Prathm Patil
96.85%tile


Amey Swami
96.70%tile


Prajkta Kambale
97.54%tile


Mahesh Sanjiv
96.65%tile


Neha Kshirsagar
96.23%tile


Shrinish Kamble
96.22%tile


Akshay Misal
96.22%tile


Sanket Dudhmande
95.71%tile


Putlabai Kusalge
95.34%tile

# चरित्रग्रंथांच्या वाचनातून व्यक्तिमत्त्वाला आकार येतो
# प्रा.डॉ. सोमनाथ कोमरपंत

## दूरदृश्य प्रणालीद्वारे संगमेश्वरमध्ये मराठी विभागाचा वर्षारंभ कार्यक्रम

सोलापूर (प्रतिनिधी)
"साहित्यातील थोर व्यक्तिमत्त्वांच्या चरित्रग्रंथ वाचनातूनच विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार प्राप्त होतो. प्रेरणादायी चरित्रग्रंथ वाचनातून,अभ्यासपूर्ण उत्तम भाषणाच्या श्रवणातून आपोआप व्यक्तिमत्व आण सृजनाच्या प्रेरणा विकसित व्हायला मदत होते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचन, लेखन, श्रवण, चिंतन करीत राहावे." असे प्रतिपादन गोवा विद्यापीठाचे निवृत्त मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. सोमनाथ कोमरपंत यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) , मराठी विभाग आयोजित वर्षारंभ समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. दूरदृश्यप्रणालीच्या साह्याने झालेल्या या कार्यक्रमात प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य, उपप्राचार्य डी.एम.मेत्री, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुहास पुजारी प्रा.डॉ. महादेव देशमुख यांसह भाषाप्रेमी विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते.

प्रारंभी प्रा. डॉ. सुहास पुजारी यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला आणि डॉ. कोमरपंत यांचा यथोचित परिचय करून दिला. त्यानंतर डॉक्टर कोमरपंत यांनी विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला. ते पुढे म्हणाले,"आधुनिक वाङ्मयाच्या कालखंडात विशेषतः विसाव्या शतकात लोकमान्य टिळकांच्या लेखनापासून ते मारुती चितमपल्ली यांच्यापर्यंतच्या लेखकांनी निसर्ग, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्याच्या विविध प्रवाहांचे जे लेखन केले ते वाचले तर असे लक्षात येईल की, हे लेखन त्या प्रतिभावंत लेखकांनी केवळ स्वान्त सुखासाठी केले नसून राष्ट्रीय, सामाजिक, निसर्ग आणि व्यक्तिस्वातंत्र्यविषयक जाणिवा समाजजीवनात वाढीस लागावे म्हणून केले आहे. हे आपणास एकदा समजले की सृजनात्मक साहित्याचे मूल्य आपल्या जीवनात किती मोठे आहे, हे कळून येईल आणि ते विद्यार्थ्यांनी जाणून घ्यावे अशी मी अपेक्षा करतो."

या व्याख्यानानंतर प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य यांनी अध्यक्षीय समारोप केला. या दूरदृश्यप्रणाली च्या साह्याने झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष पवार यांनी केले. डॉ. सारीपुत्र तुपेरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.




दूरदृश्यप्रणाली च्या साह्याने झालेल्या कार्यक्रमाचा संपूर्ण व्हिडीओ पहा खालील लिंक वरुन आणि चॅनेल सबस्क्राईब करा..

https://youtu.be/Km7xGrqEzy8

YouTube

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे

# संगमेश्वर कॉलेज(स्वायत्त),सोलापूर

## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त व्याख्यान



## धन शब्दांचींच रत्नें

**वक्ते : मा. हृषीकेश अयाचित**

सेवानिवृत्त निवेदक, आकाशवाणी



सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१ संध्याकाळी ०५ वाजता

अध्यक्ष : प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य

प्रा. डॉ. सुहास पुजारी

मराठी विभागप्रमुख

Google Meet

प्रा.डॉ.महादेव देशमुख

डॉ सारीपुत्र तुपेरे

प्रा.संतोष पवार


# तरुण भारत संवाद

## भाषेच्या वैविध्यपूर्ण कला अंगी येण्यासाठी तपश्चर्या करावी

प्रतिनिधी

सोलापूर

एखादी भाषा उत्तम रीतीने आत्मसात करायची झाली तर त्या भाषेसाठी आपल्याला साधना करावी लागते. श्रवण आणि सराव या दोन्हीतील सातत्याने भाषेचे सौंदर्य आपल्या ठायी निर्माण होते. भाषेच्या वैविध्यपूर्ण कला अंगी येण्यासाठी तपश्चर्या करावी लागते, अशी तपश्चर्या केली की आपल्या कंठामध्ये एक भाषेचा गोडवा निर्माण होतो. भाषेचे एक अनोखेपण असते ते प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वातून प्रकटते. ती त्या व्यक्तिमत्तवाची ओळख असते, असे प्रतिपादन आकाशवाणीचे सेवानिवृत्त निवेदक हृषीकेश अयाचित यांनी केले.



हृषीकेश अयाचित यांचे मत

संगमेश्वर कॉलेज, मराठी विभाग आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या व्याख्यानात बोलत होते. या सत्रात त्यांनी विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापकांशी मुक्त संवाद साधला. प्रारंभी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुहास पुजारी यांनी प्रास्ताविक करून वक्त्यांची ओळख करून दिली. त्यानंतर प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य यांनी मनोगत व्यक्त केले. अयाचित यांनी आपल्या आकाशवाणीच्या सेवेतील विविधांगी अनुभव सांगत विद्यार्थ्यांना संबोधित केले. दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले तर आभार प्रा.डॉ. सारीपुत्र तुपेरे यांनी मानले. उपप्राचार्य डी. एम. मेत्री, प्रा. डॉ. महादेव देशमुख, प्रा. अश्विनी जोग, प्रा. डॉ. संघप्रकाश दुड्डे, प्रा. डॉ. दादासाहेब खांडेकर, डॉ. विजय मुलीमनी, संतोष कुलकर्णी, विद्यार्थी हृतिक कुर्ले आदी उपस्थित होते.






## कला शाखा - ७१.९७



## वाणिज्य शाखा - ९५.१३






सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव, कधी नव्हे तो अनुभवलेला लॉकडाऊन, घराबाहेर पडताच विषाणू घरात येईल काय? अशी मनामध्ये असणारी अनामिक भीती अशा वातावरणात जणू भय इथले संपत नाही असे वाटते. परंतु संकटांना घाबरून न जाता संघर्ष करत यशस्वीपणे मात करणारी अनेक मंडळी आपण पाहतो. हे कसं शक्य होतं ? मलाही उद्या कोरोना झाला तर मी पण यशस्वीपणे मात करू शकेल का? नुसता ताप आला म्हणजे कोरोना झाला का सर्दी झाली म्हणजे कोरोना झाला का? अशा अनेकविध प्रश्नांची मालिका आपल्या मनामध्ये रुंजी घालत असते. या शंकांना तज्ञ डॉक्टरांकडूनच उत्तरे मिळाली तर अधिक चांगले. केवळ ह्यासाठीच

**कोरोना महामारी :**
**भय आणि वास्तव**

या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत तसेच आपल्या मनातील या आजाराविषयी असणाऱ्या शंकांचं निरसन करणार आहेत. हा वेबिनार संगमेश्वर परिवारातील सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी व संगमेश्वर परिवारावर मनापासून प्रेम करणाऱ्या सर्वांसाठी खुला आहे


कर्मयोगी कै. आदरणीय
अप्पासाहेब काडादी
यांच्या स्मृतिदिनानिमित्त
विनम्र अभिवादन...
SHRI
S. E. SOCIETY
SOLAPUR
संगमेश्वर कॉलेज
(स्वायत्त), सोलापूर


प्रज्ञा
२०२०
S. S. E. SOCIETY
SOLAPUR
संगमेश्वर कॉलेज
NAAC (III Cycle) 'A' Grade (CGPA 3.39)
सृजनरंग नियतकालिक स्पर्धा 2019 – 20 मध्ये
आमच्या संगमेश्वर महाविद्यालयाच्या 'प्रज्ञा' या
नियतकालिकास पारंपारिक महाविद्यालयातून
विद्यापीठ स्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला आहे.
सहभागी विद्यार्थी, संपादक मंडळ आणि तंत्रज्ञ् यांचे मनःपूर्वक
हार्दिक अभिनंदन.
संगमेश्वर कॉलेज, सोलापूर




अन्य भाषेतील अनुवादाने मराठी भाषेयतील साहित्य दालन समृद्ध होत जाते. म्हणून भाषा समृद्धी साठी जितका साहित्याविषयीचा आदर महत्त्वाचा तितकाच साहित्यिकांविषयीचा आदर देखील महत्त्वाचा आहे व तरच भाषा समृद्धीकडे आपण खऱ्या अर्थाने वाटचाल करू शकू. त्याच पद्धतीने मराठी भाषेमध्ये मराठी वाचकांकडून व्यासंगी वाचन तसेच अन्य भाषेतील शब्दांचा तितकाच सहृदयतेने स्वीकार होत राहिला तर भाषा समृद्ध होण्याचा मार्ग अजून सुकर होईल. असा विचार महाजन यांनी मांडला.

संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित श्री संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) मराठी विभागातर्फे, मराठी भाषा गौरव दिन आणि कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांच्या स्मृतीदिनानिमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ.इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय औरंगाबाद येथील निवृत्त प्राचार्य , ज्येष्ठ अनुवादक व लेखिका डॉ. छाया महाजन बोलत होत्या. या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य होत्या.

**या कार्यक्रमाचा संपूर्ण व्हिडिओ पाहण्यासाठी लिंक**

https://youtu.be/GdTzTXPOy5g

# अन्य भाषेतील अनुवादाने साहित्य दालन समृद्ध होत जाते.
## - डॉ. छाया महाजन

## मराठी भाषा गौरव दिन आणि कर्मयोगी अप्पासाहेब काडादी स्मृतिदिनानिमित्त दूरदृश्यप्रणालीतुन व्याख्यान

सोलापूर ( प्रतिनिधी )" अन्य भाषेतील अनुवादाने मराठी भाषेयतील साहित्य दालन समृद्ध होत जाते. म्हणून भाषा समृद्धी साठी जितका साहित्याविषयीचा आदर महत्त्वाचा तितकाच साहित्यिकांविषयीचा आदर देखील महत्त्वाचा आहे व तरच भाषा समृद्धीकडे आपण खऱ्या अर्थाने वाटचाल करू शकू. त्याच पद्धतीने मराठी भाषेमध्ये मराठी वाचकांकडून व्यासंगी वाचन तसेच अन्य भाषेतील शब्दांचा तितकाच सहृदयतेने स्वीकार होत राहिला तर भाषा समृद्ध होण्याचा मार्ग अजून सुकर होईल. असा विचार महाजन यांनी मांडला.

संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित श्री संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) मराठी विभागातर्फे, मराठी भाषा गौरव दिन आणि कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांच्या स्मृतीदिनानिमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ.इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय औरंगाबाद येथील निवृत्त प्राचार्य , ज्येष्ठ अनुवादक व लेखिका डॉ. छाया महाजन बोलत होत्या. या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य होत्या.

दूरदृश्य प्रणालीचे सारथ्य करत संतोष पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सुहास पुजारी यांनी केले. याप्रसंगी त्यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून देत सर्व उपस्थितांचे स्वागत केले तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यदिनानिमित्त त्यांच्या एकूणच साहित्याची कर्तुत्वाची व राष्ट्र सेवेची आठवण करून दिली आणि मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

उत्तम अनुवाद ही जरी क्लिष्ट गुंतागुंतीची प्रक्रिया असली तरीदेखील ती होणे आवश्यक आहे. अशी नोंद त्यांनी घेतली. मराठी भाषेत अनुवादित साहित्याचे दालन समृद्ध आहेच परंतु जेवढे अधिकाधिक मराठी साहित्यात अनुवाद होतील. तितकेच मराठी साहित्याचे अन्य भाषांमधील अदान प्रदान होत राहील व भाषासमृद्धी होण्याचे ते ते एक आदर्श कार्य असेल असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. भाषा ही नीतिमूल्यांची संरक्षक आहे. तर साहित्य तुम्हाला आरसा दाखवते. लेखक लिहितो पण वाचकच त्याचा खऱ्या अर्थाने समीक्षक असतो. अशी नोंद त्यांनी घेत त्यांनी वेगवेगळ्या साहित्यकृतींच्या संदर्भातील महती त्यांनी यावेळी स्पष्ट केली. नव्या संस्कृतीची, नव्या समाजकारणाची तसेच जागतिक संस्कृतीची तसेच माणसांच्या मूलभूत प्रवृत्तींचा शोध घ्यायचा झाला तर अनुवादित साहित्याची आपणास मदत घ्यावीच लागेल. संस्कृत, पाली, इंग्लिश, हिंदी भाषांमधील अनुवादाचे दाखले देत त्यांनी विषयाची मांडणी केली.

या प्रसंगी मराठी विभागातील प्रा.डॉ. महादेव देशमुख प्रा. डॉ. सारीपुत्र तुपेरे तसेच महाराष्ट्रभरातून अन्य मान्यवर प्राध्यापक मंडळी यांची उपस्थिती होती. शेवटी आभार हृतिक कुर्ले या विद्यार्थ्याने मानले.

# मायबोली विद्यार्थी जीवनाला आकार देते -दीपक कलढोणे

## संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये 'मराठी भाषा गौरव दिन'

सोलापूर (प्रतिनिधी )" विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांच्या शिक्षणात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मातृभाषा विद्यार्थी जीवनाला आकार देते. वैविध्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण मिळते. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने शालेय स्तरावरील उपक्रम कौतुकास्पद आहेत. कला ,साहित्य , संगीताची गोडी विद्यार्थ्याला परिपूर्ण घडवण्यासाठी कारणीभूत ठरतात. भाषा संवर्धनासाठी आकाशवाणी सारख्या श्राव्य माध्यमाचे शाळा स्तरावरील भाषिक उपक्रम नक्कीच कौतुकास्पद आहेत .'' असे प्रतिपादन संगीत शिक्षक, कवी, लेखक, पं.दीपक कलढोणे यांनी केले. ते संगमेश्वर पब्लिक स्कूल आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी मंचावर प्राचार्य गायत्री कुलकर्णी अध्यक्षस्थानी उपस्थित होते.




**संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये ' मराठी भाषा गौरव दिन ' साजरा झाला त्याप्रसंगी बोलताना संगीत शिक्षक, कवी, लेखक, पं.दीपक कलढोणे**



प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त आणि संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेस त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर गायत्री कुलकर्णी यांनी आपल्या प्रास्ताविकातून आकाशवाणी आणि संगमेश्वर पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त उपक्रमाचा हेतू स्पष्ट केला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शाळेच्या वतीने झाला. सत्कारानंतर बक्षीस बक्षीसपात्र विजेत्या विद्यार्थी स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला.

पं. दीपक कलढोणे पुढे म्हणाले की, " आकाशवाणीच्या माध्यमातून वाणीचे संस्कार होतात. पठण, वाचन, चिंतन, मनन यातून विद्यार्थ्यांचे मानसिक भरण पोषण होते. वक्तृत्व , कथाकथन ,चित्रकला या कष्टसाध्य कला आहेत. या कलांची गोडी शालेय जीवनात लागलीच पाहिजे असे उपक्रम व्हावेत ." कुसुमाग्रजांच्या कवितांच्या वाचनाने कार्यक्रमात आणखी रंगत आली. याप्रसंगी संगमेश्वर पब्लिक स्कूल आणि आकाशवाणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्पर्धातील विजेत्या स्पर्धकांची आणि त्यांच्या पालकांची उपस्थिती होती. प्रा.डॉ. सुहास पुजारी, संतोष पवार,शोभा गोटे, वैष्णवी देशपांडे ,पब्लिक स्कूल मधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.सूत्रसंचालन लक्ष्मी मल्लाडे यांनी केले तर आभार प्रीती दुलंगे यांनी मानले.

# जेईई परीक्षेत 'संगमेश्वर'च्या विद्यार्थ्यांचे यश



रिया कस्तुरे



चिन्मय धमगुंडे



मिताली पाटील



आदिती कुलकर्णी



अभिजित ख्याडे

**संचार प्रतिनिधी**

**सोलापूर, दि. १०-** नॅशनल टेस्टिंग एजन्सी नवी दिल्ली यांच्यातर्फे घेण्यात येणाऱ्या जेईई मेन्स २०२१ या परीक्षेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या १९ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

**विद्यार्थ्यांचे नाव व गुण :** रिया कस्तुरे ९६.६२, अभिजित खाडे ९६.४१, मिताली पाटील ९५.८०, आदिती कुलकर्णी ९५.६०, चिन्मय धमगुंडे ९४.०६, श्रेयस शिंदे ९३.५५, तमन्ना समदूर ९३.०४, सौरव वैरागकर ९०.२७, प्रणोती खोवण ८९.०१, जानवी कुलकर्णी ८७.११, गौरव कुलकर्णी ८७.११, श्रेय मसलेकर ८६.८२, यश निर्मल ८६.०९, राहुल जगताप ८५.३५, हरीश मंता ८५.१९, अजिंक्य शिंदे ८३.०३, अक्षत कुडाळकर ८१.८३, अन्नराज विराजदार ८१.०२, अस्मिता हचाडे ८०.४९.


गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्या शोभा राजमान्य, उपप्राचार्य ए. के. हुली, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, लॉजिक फॅकल्टी शिवराज वगले, अविनाश घोडके, सुशांत माळवे, डॉ. अनिल देवकर, समन्वयक डॉ. गणेश मुडेगावकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.







कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या कॅमेरातून टिपलेली ही काही क्षणचित्रे...



▶ सोलापूर : हे कोकण नव्हे तर येथील ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिर परिसरातील तलावाचे नयनरम्य दृश्य.
छाया : संदीप वाडेकर

# कोरोना 19 काळात कॉलेजच्या युट्युब वरून प्रसारित झालेल्या कार्यक्रमांची ओळख













